| CNR No.MHND270001332026 | आरजेई क्र.२१/२०२६ |
|---|---|
| | पिंपळाबाई व ईतर विरुध्द निरंक |

## निशाणी क्र.१ वरील आदेश

१. प्रस्तूतचा अर्ज अर्जदारांनी बॉम्बे रेग्यूलेशन कायद्याचे {यानंतर 'सदर कायदा' असे संबोधण्यात येत आहे} कलम ३ अन्वये वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जाच्या अनुषंगाने **"श्रमिक एकजुट"** या वृत्तपत्रामध्ये १२ फेब्रुवारी, २०२६ रोजी प्रमाणे जाहीर प्रगटण प्रकाशित करुन हरकती मागविल्या, परंतु या अर्जावर मुदतीमध्ये कोणीही आक्षेप दाखल केलेला नाही.

३. अर्जदारांचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. त्यांचा युक्तीवाद श्रवणोपरांत माझे समक्ष खालील मुद्दे विचारासाठी निर्माण झाले, ज्याची उत्तरे त्या खाली दिलेल्या कारणमिमांसेस्तव देण्यात आली.

| अ.क्र. | मुद्दे | उत्तर |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे बॉम्बे रेग्यूलेशन कायद्यातील तरतूदीन्वये वारसाहक्क प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत काय ? | होय. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशा प्रमाणे |

## कारणमिमांसा

मुद्दा क्र.१ साठी :-

४. अर्जातील कथने सिद्ध करण्यासाठी देविदास पि. बाबू राठोड यांनी सर्वांच्या वतीने स्वतःची साक्ष **निशाणी क्र.०९** प्रमाणे नोंदवून अर्जातील मजकूराचे पुनरुच्चारण केले आहे. त्याच बरोबर कागदोपत्री पुरावा म्हणून **मयत बाबू पि. सुर्यभान राठोड** यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची व्हेरीफाईड प्रत निशाणी क्र.१० वर व अर्जदारांच्या आधार कार्डच्या व्हेरीफाईड प्रती नि.क्र.११ ते १८ वर, आणि जाहीर प्रगटन निशाणी

क्र.१९ वर दाखल केले आणि साक्ष संपल्याची पुरसीस दाखल केली आहे.

५. पटलावर दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार हे मयताचे वारस आहेत.

६. प्रस्तूत प्रकरणी दैनिक वर्तमानपत्रामध्ये जाहीर प्रगटन देवूनसुध्दा मुदतीमध्ये अर्जदारांच्या मागणीसाठी कोणीही आक्षेप घेतलेला नाही. त्यामुळे, अर्जदारांचा पुरावा अखंडीत राहीला. म्हणून अर्जदारांचा पुरावा जसाच्या तसा ग्राहय धरणे अवश्यक आहे. बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १९२७ नियम ३ च्या तरतुदीन्वये कागदपत्रांचे अवलोकन केले असता, अर्जदारांनी उपरोक्त नियमानुसार जाहीर नोटीसद्वारे याबाबत असलेल्या आक्षेपांची पुर्तता केली आहे. सदर कायद्यान्वये या न्यायालयाला वारसाहक्क प्रमाणपत्र देण्याबाबत प्राधिकृत केले आहे. उपरोक्त तोंडी व लेखी पुराव्याचे अवलोकन केल्यानंतर मी या मताशी आहे की, अर्जदार हे बॉम्बे रेग्युलेशन कायद्यातील तरतूदीन्वये वारसाहक्क प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. सबब, मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी दिले आहे.

**मुद्दा क्र.२ साठी** :-

७. मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी दिल्यामुळे अर्ज मंजूर होणे न्यायोचित आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१. प्रस्तूत अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार हे **मयत बाबू पि. सुर्यभान राठोड** यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट नुसार विहित नमुन्यामध्ये आणि नियमाप्रमाणे आवश्यक ती कोर्ट फी भरणा केल्यानंतर जारी करण्यात यावे.

( आदेश खुल्या न्यायालयात घोषित )

सही/-

**दि. ०४.०४.२०२६**

**(श्रीमती शीतल पी. कौल )**

दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,मुदखेड

जि.नांदेड.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File judgment are same word to word, as per the original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the stenographer | : | Swati Pawar |
| Court Name | : | CJJD, Mudkhed |
| Date | : | 04/04/2026 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 04/04/2026 |
| Judgment Uploaded on | : | 04/04/2026 |